म वि नि आ

# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

१३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई - ४०० ००५.
दूरध्वनी क्र. : ०२२ २२१६ ३९६४/२२१६ ३९६५/२२१६ ३९६९ ◆ फॅक्स क्र. ०२२-२२१६ ३९७६
वेब-साईट : www.mercindia.org.in ◆ ई-मेल : mercindia@mercindia.org.in

क्र.मविनिआ/प्रशा/सीएसी-एसीआर२०१२-१३/02836 दि.: ११ मार्च, २०१३

## अधिसूचना

### संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी प्राधिकृत करणे

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगासमोरील **(आयोग किंवा मविनिआ)** कामकाजामध्ये **उत्तर महाराष्ट्र विभागातील** विद्युत ग्राहकांच्या हिताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी एक संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी प्राधिकृत करण्यात येईल, अशी तरतूद मविनिआ (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२च्या विनियम ७.१ मध्ये आहे.

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ च्या विनियम ८.१ च्या अनुषंगाने महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, आयोगासमोरील कामकाजात **उत्तर महाराष्ट्र विभागातील** विद्युत ग्राहकांच्या हिताचे प्रतिनिधित्व करण्यासाठी **नाशिक येथे शाखा** असलेल्या खालील संस्थेला ही अधिसूचना निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून **६ वर्षांच्या** कालावधीकरिता **संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी** म्हणून प्राधिकृत केले आहे :

महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँण्ड ॲग्रिकल्चर,
ओरिकॉन हाऊस, ६ वा मजला,
१२, के. दुभाष मार्ग, फोर्ट,
मुंबई - ४०० ००१
(नाशिक शाखा)

सदर संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी, मविनिआ (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ मधील विनियम, १० मध्ये त्यांना नेमून दिलेली कार्ये आणि कर्तव्ये पार पाडेल.

आयोग, एखाद्या विशिष्ट प्रकरणी किंवा बाबीवर वरील संस्थेच्या ग्राहक प्रतिनिधींकडून लेखी किंवा तोंडी निवेदनाची मागणी करेल.

ही अधिसूचना निवड समितीच्या शिफारशींच्या आधारे, या विनियमांच्या विनियम ५.४ मधील तरतुदीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

**(कुलदीप ना. खवारे)**
सचिव,
महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, मुंबई